उल्हासनगर महानगरपालिका, मालमत्ता कर विभाग
ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION, PROPERTY TAX DEPT.
मुख्यकार्यालय, तळमजला, उल्हासनगर-४२१ ००३ जिल्हाठाणे, महाराष्ट्र
Head Office, Ground Floor, Ulhasnagar-421 003 Dist Thane, Maharashtra
Tel No:- ९५२५१-२७२०११६ /१२५ Ext. No. ११६ Fax No:- ९५२५१-२७२०१०४

जा.क्र./उमपा/करवि/यु.८/१९०/२०२३

दिनांक ०८/०६/२०२३

वाचा:- १) विशेष नोटीस क्र. उमपा/करवि/यु.८/१९०, दिनांक २९/०४/२०२३
२) श्री. दिपक नामदेव आढाव यांनी दि.०३/०५/२०२३ रोजी दाखल केलेली हरकत.
(ना.सु.केंद्र टोकन क्र. ४१२०२३००००८२१८)
३) जा.क्र./उमपा/करवि/१९०, दि. ३१/०५/२०२३ रोजीची सुनावणी नोटीस.
४) सुनावणीचा दिनांक ०७/०६/२०२३

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. 58DO012271500 (विर तानाजी नगर, उल्हासनगर-५) अन्वये नोंद असलेल्या मिळकती करीता कर निर्धानासंबंधी संदर्भ क्र. १ अन्वये विषेश नोटीस बजावण्यात आली आहे.

उक्त नोटीसच्या अनुषंगाने संदर्भ क्र. २ अन्वये कर आकारणी जास्त आहे. ती मान्य नसल्यामुळे सदरची कर आकारणी दुरूस्त करावी. अशी हरकत दाखल केली आहे.

उक्त हरकतीच्या अनुषंगाने संदर्भ क्र. ३ नुसार संबंधितास सुनावणीस उपस्थित राहणे बाबत नोटीस बजावण्यात आली आहे.

दिनांक ०७/०६/२०२३ रोजी सुनावणी दरम्यान श्रीम. नंदा नामदेव आढाव यांचे वतीने श्री. दिपक नामदेव आढाव हे उपस्थित असुन त्यांनी संदर्भ क्र. २ चे अर्जान्वये कर आकारणी जास्त आहे. ती दुरूस्त करावी. असे निवेदन सादर केले आहे.

संदर्भित मिळकतीचे क्षेत्रफळ, वापर, बांधकाम प्रकार, विशेष नोटीसी प्रमाणे बरोबर आहे. सबब संदर्भित मिळकती करीता विशेष नोटीस नुसार निश्चित करण्यात आलेले कर योग्य मुल्य व आकारणी कायम करण्यास शिफारस करण्यात आली आहे.

यास्तव मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) श्री. दिपक नामदेव आढाव यांनी दाखल केलेली हरकत अमान्य करण्यात येत आहे.

२) उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 58DO012271500 (विर तानाजी नगर, उल्हासनगर-५) अन्वये नोंद असलेल्या मिळकती करीता विशेष नोटीस नुसार निश्चित करण्यात आलेले करयोग्य मुल्य व आकारणी कायम करुन संबंधित मिळकतधारकास वर्ष २०२३-२०२४ करीता बिल बजावण्यात यावे.

(प्रियंका राजपूत)
उप आयुक्त (कर)
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत,

१) मे कोल्ब्रो ग्रुप, नागपुर
२) श्री.दिपक/ नंदा नामदेव आढाव रा. विर तानाजी नगर, उल्हासनगर-५

Scanned with CamScanner